# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दिनांक : ०६ ऑक्टोबर, २०२०

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### अंतिम सत्र/अंतिम वर्षातील परीक्षा देवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेकरिता सूचना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित अंतिम सत्र/अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना सूचना करण्यात येते की, अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा देवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या परीक्षा दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० पासून सुरु होत आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा देण्यासाठीचा विकल्प निवडलेला आहे अशा विद्यार्थ्यांकरिता परीक्षेसाठी वापरली जाणारी संगणक प्रणाली (Software), मोबाईलकरिताचे ॲप याबाबतची संपूर्ण माहिती होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाकडून सराव चाचणीचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर सराव चाचणीचे आयोजन दिनांक ८ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ११ ऑक्टोबर, २०२० दरम्यान सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेमध्ये घेण्यात येऊन प्रत्येक विद्यार्थ्याला किमान पाच वेळा सराव चाचणी देता येतील. प्रत्येक सराव चाचणी ही सर्वसाधारण क्षमता आकलन पध्दतीच्या प्रश्नांवर आधारीत असून ६० प्रश्नांची, ५० गुणांची एक तासाची राहील. सराव चाचणीला संगणकीय प्रणालीतून प्रवेश मिळविण्यासाठी https://sppu.wheebox.com/LOGIN-2/sppu.jsp या युआरएलचा वापर करण्यात यावा. यासंदर्भात विद्यार्थ्यांना सर्व माहिती त्यांच्या Student Profile वर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच विषयनिहाय सराव प्रश्नसंच स्वतंत्रपणे विद्यार्थ्यांच्या आकलनाकरिता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षांपूर्वी उपलब्ध करुन देण्यात येतील.

महेश काकडे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ